# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/01/2023 (बुधवार) सकाळ

### जबरी संभोग

**पो.स्टे. सावनेर :–** दिनांक २३/०१/२०२३ चे १७.०० वा. ते २०.३० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पिडीता वय १६ वर्ष ०७ महिने हिला आरोपी नामे–१) अखिल उर्फ अक्की महावीर, भोंगे वय २६ वर्ष, रा वार्ड क्र. ३ पंदराखेडी ता. सावनेर २) पवन विठ्ठलराव बासकवरे वय २४ वर्ष रा मानेगाव ता. सावनेर यांनी त्यांची कार क्र. एम. एच.–३१/डी. व्ही.–४८९४ मध्ये फिर्यादीला घरी सोडून देण्याचे बहाण्याने कार मध्ये बसवून नागपूरकडे जाणाऱ्या हायवे रोड व नंतर कोदेगाव कडे जाणाऱ्या सुनसान डांबरी रोडवर घेऊन जाऊन त्यांनी आळीपाळीने पिडीतेवर जबरदस्तीने बलात्कार केला व ती प्रतिकार करीत असतांना तिचे गालावर मारले व तु पोलिस स्टेशनला गेल्यास मी तुझेबाबत पोलिसांना उलटे तिलटे सांगुन तुझ्या विरूध्द भडकविन व तुला जिवाने मारून टाकीन अशी धमकी दिली व नंतर त्या दोघांनी त्याच कारने पिडीतेला गुजरखेडी येथे मेन रोडवर आणून सोडले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३६३, ३७६ (२)(जे), ३७६(ड), ३२३, ५०६, ३४ भा.द.वि. सहकलम पोक्सो कायदा कलम ४, ६ प्रमाणे कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलीस निरीक्षक सोनाली रासकर पोलीस स्टेशन सावनेर मो. क्र. ९०८२१९६०८० या करीत आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. बुट्टीबोरी :–** अंतर्गत मौजा महाविर ट्रेडींग कंपनी बुट्टीबोरी येथे दिनांक २३/०१/२०२३ ते २४/०१/२०२३ चे २१.०० वा. ते ०९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– विजय रामनिवास सारडा, वय ४४ वर्ष रा. सिडको बुटीबोरी हे महाविर ट्रेडिंग कंपनी नावाचे किराणा दुकान बंद करून घरी गेले असता फिर्यादीचे दुकानात काम करणारा मुलगा नामे– तुषार अंकुश भोयर, रा. शिरूळ ता. हिंगणा याने फिर्यादीला फोन करून सांगीतले की, किराणा दुकानात चोरी झाल्याचे दिसत आहे. सामान अस्ताव्यस्त पडलेले आहे. असे सांगीतल्याने फिर्यादी घरून लगेच दुकानात गेले त्यावेळी दुकानाचे आत पाहीले तेव्हा दुकानात असलेले डी. व्हि. आर व सिगारेटचे पाकीटे दिसून आले नाही डी. व्ही. आर व वायर वगैरे तोडून दिसले. तसेच कॅशकांऊटर तुटलेले दिसले त्यामध्ये असलेले १५०००/–रू. दिसले नाही. तेव्हा फिर्यादीला दुकानाचे पाठीमागचे लोखंडी शटर वाकवून असल्याचे दिसले पोलीस स्टेशनला फोन करून महाविर ट्रेडिंग कंपनी नावाचे दुकानाचे मागील शटर वाकवून दुकानात घुसून कॅशकाउंटर तोडून नगदी असा एकुण १५०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३८०, ४५४, ४५७ भादवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार १८८७ अरविंद चव्हाण मो. नं. ७४९९६०४६७२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर